| लातूर | वर्ष ३५ वे | अंक २९ वा | रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# ज्येष्ठ गायिका आशा भोसले काळाच्या पडद्याआड



उद्या सायंकाळी चार वाजता शिवाजी पार्क येथे त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार होतील.

मुंबई/प्रतिनिधी : प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतविश्वावर शोककळा पसरली आहे. शनिवारी आशा भोसले यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक होती. अखेर वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. सोमवारी १३ एप्रिल रोजी संध्याकाळी ४ वाजता शिवाजी पार्क येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येतील.

८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली येथे जन्मलेल्या आशा ताईंनी वडील दीनानाथ मंगेशकर यांच्या संस्कारातून संगीताचे धडे घेतले. सुरुवातीच्या संघर्षानंतर त्यांनी हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, तेलुगू अशा २० पेक्षा अधिक भाषांमध्ये १२ हजारांहून अधिक गाणी रेकॉर्ड करून विक्रम प्रस्थापित केला. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, चुरा लिया है तुमने, ये मेरा दिल यांसारखी गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. विशेषतः आर.डी बर्मन यांच्यासोबतची त्यांची जोडी भारतीय चित्रपटसंगीताच्या इतिहासातील सर्वात यशस्वी जोड्यांपैकी एक ठरली.

आशा भोसले यांचा आवाज म्हणजे केवळ गाणे नव्हते तर प्रत्येक भावनेला जिवंत करणारी जादू होती. त्यांच्या कारकिर्दीसाठी पद्म विभूषण पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. वडिलांच्या निधनानंतर अगदी लहान वयातच आशा भोसले यांनी गायनाला सुरुवात केली. त्यांचे पहिले मराठी गाणे चला चला नव बाळा (१९४३) तर हिंदीतील सुरुवातीच्या गाण्यांमुळे त्यांना चित्रपटसृष्टीत ओळख मिळाली. आशाताईंनी केवळ फिल्मी गाणीच नाही तर गझल, भजन, कव्वाली, पॉप, मराठी भावगीते, बंगाली आणि इतर प्रादेशिक गाणी गायली आहेत. आशा ताईंच्या आवाजात रोमॅन्स, विरह, खट्याळपणा आणि गझलेची नजाकत एकाच वेळी अनुभवायला मिळत होती. त्यांचा आवाज म्हणजे भारतीय संगीतविश्वाचा एक अमर ठेवा आहे. गेल्या ८ दशकांहून अधिक काळ आपल्या सुरेल, बहुआयामी आणि जादुई आवाजाने कोट्यवधी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा स्वर आज कायमचा शांत झाला आहे.

अवयव निकामी झाल्याने आशा भोसलेंचे निधन, डॉक्टरांनी दिली माहिती

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे शनिवारी ब्रीच कँडी रुग्णलायात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे अवयव निकामी झाल्याने त्यांनी अखेरचा श्वास घेतला. या संदर्भात त्यांचे सुपूत्र आनंद भोसले यांनी आज प्रसिद्धी माध्यमांना माहिती दिली.

### आनंद भोसले यांनी नेमकं काय सांगितलं?

आशा भोसले यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली की त्यांची आई आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं आहे. आशा भोसलेंचे अवयव निकामी होत गेले, त्यामुळे त्यांचं निधन झालं. आशा भोसले यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. उद्या सकाळी ११ ते २ या वेळेत त्या लोअर परळ या ठिकाणी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत अशी माहिती आनंद भोसले यांनी दिली.

### आशिष शेलार यांनी नेमकं काय म्हटलं आहे?

आज संपूर्ण देश आणि महाराष्ट्र आकंठपणे दुःखात बुडाला आहे. एका युगाचा अंत झाला आहे, आपल्या आशाताई आपल्यातून निघून गेल्या आहेत. आशाताईंचं असणं हे वर्षानुवर्षे समाधानाची अनुभूती देत होतं. आपण दुःखाला कवटाळून लोकांना आनंद देणं ही त्यांची खासियत होती. त्यांचं कर्तृत्व जगाला वेड लावणारं होतं. अशा आशाताई आज आपल्यात राहिल्या नाहीत. आता कुटुंबाने सांगितल्याप्रमाणे उद्या त्यांचं पार्थिव त्यांच्या लोअर परळ येथील निवासस्थानी ठेवण्यात येईल. तिथे लोकांना अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात येतील. शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांचं नसणं हे आपल्याला आयुष्यभर दुःख देणारं आहे असं आशिष शेलार यांनी म्हटलं आहे.

सांगली या ठिकाणी आशा भोसले यांचा जन्म झाला होता. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी गायनाला सुरुवात केली होती. गिनिज बुकात सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी त्यांची नोंद झाली आहे. आपल्या वेगळ्या आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचं गाणं कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वाहिली श्रद्धांजली

अत्यंत दुःखद प्रसंग आहे. मंगेशकर कुटुंबियातील दुसरा तारा, आशा भोसले यांचं दुःखद निधन झालं आहे. ९२ वर्षे त्या जगल्या, त्यातल्या बहुतांश काळ वयाच्या ५-६ व्या वर्षापासून संगीताची सेवा केली तर अखेरच्या श्वासापर्यंत. या देशात सर्वात वर्सटाइल गायक म्हणून कोणाकडे पाहायचं असेल तर त्या आशाताई होत्या. आशाताईंनी क्लासिकल गाणंही म्हटलं, त्याचवेळी अतिशय आधुनिक गाणंही लिलया म्हटलं. जेवढे जॉनर आहेत, शास्त्रीय संगीत, पॉप, रॉक, भावगीत असो, २० पेक्षा जास्त भाषांमध्ये आशाताईंनी गाणी म्हटली-

९० व्या वर्षी कॉन्सर्ट करणाऱ्या आशाताई होत्या. आम्ही महाराष्ट्र भूषण पुरस्कार दिला तेव्हा त्यांनी जीवनाचा प्रवास सांगितला. किती खडतर आयुष्य जगत त्या इथवर पोहोचल्या, हे प्रेरणादायी होतं. रेडिओ जॉकीचा कार्यक्रम घेतला होता, त्या कार्यक्रमात आशाताईंनी मला दोन ओळी गुणगुणायला लावल्या, त्यावेळी त्या म्हणाल्या की माझी शक्ती मी महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांना गायला लावू शकते, असं अतिशय जिंदादील व्यक्तीमत्त्व होतं. कोणत्याही कार्यक्रमाची त्या ठिकाणी त्या प्राण असायच्या. सतत हसतमुख असायच्या. ९२ व्या वर्षीही त्यांचा उत्साह वाखणण्यासारखा होता. लता दीदींची आम्ही १०० वी करू शकलो नाही, पण आशाताईंची १०० वी करू शकू असं वाटलं होतं, पण काळाने ती संधी दिली नाही. इश्वरीय आवाज असलेल्या एक आमच्या गायिका आमच्यातून निघून गेल्या, मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो - देवेंद्र फडणवीस

## प्रभात किरणे

जे जी करती कष्टाचे
दान तयाशी मिळे त्याचे
पुण्य देखावा दिखावा
जे दाखवी तयाचे कृती
वाणी फसवी

-इंजि. नागनाथ
कलवले लातूर
९१-९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



भारतीय घरांमध्ये जगातील टॉप-१० बँके पेक्षा जास्त सोने......

## चिमटा दयाचा



शेत व शिवरस्ता
खुला करण्याची
गरज आहे!
मोठ्या पुढारी शेतकऱ्याने
बळकावला आहे!!
कुंपनच शेत
खात आहे!!

## अहिल्यानगर ते बीड सुसाट, गेम चेंजर प्रकल्पाची डेडलाईन ठरली!

### साडेचार तासांचा प्रवास अडीच तासात



**बीड/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील जनतेचे गेल्या अनेक वर्षांचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. या भागातील रेल्वेने जाळे अधिक मजबूत होत असून अहिल्यानगर-बीड-परळी या २६१ किमीच्या ब्रॉडगेज मार्गाची उभारणी करण्यात येत आहे. आता या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून मे २०२६ अखेर हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रवास जलद आणि सुखकर होणार असून वेळही वाचेल.

नुकतेच बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड ते परळी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली. वडवणीपर्यंत मोपेड ट्रॉलीने प्रवास करत घोडका जुरी, बावी, उपळी, लोळद, चटागाव, फकीरजवळा, देवदहिफळ, खामगाव, तपोवन, आदी गावांतील रेल्वेच्या कामांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत उपमुख्य अभियंता, माजलगाव व परळीचे उपविभागीय अधिकारी आणि इतर अधिकारी होते.

अहिल्यानगर ते बीड या १६७ किमीच्या मार्गावर सध्या डेमू रेल्वे सुरू आहे. सिग्नल इंटरलॉकिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर या गाडीचा वेग वाढणार आहे. विशेष म्हणजे त्यामुळे साडेचार तासांचा प्रवास अवघ्या अडीच तासात होईल. हा मार्ग पुणे रेल्वे मार्गाशी जोडण्यासाठी पुण्यातील हडपसर येथे प्लॅटफफॉर्म उपलब्ध करून देण्याचे नियोजन देखील सुरू आहे.

दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकारच्या ५०-५० टक्के भागीदारीतून हा प्रकल्प होत आहे. यामध्ये बीड ते वडवणी दरम्यान भू-संपादन आणि रेल्वे विभागाची महत्त्वाची कामे पूर्ण झाली आहेत. तर काही ठिकाणी उन्नत पुलांची कामे सुरू आहेत. त्यात विविध अडथळे दूर झाल्याने भू-संपादन प्रक्रिया देखील अंतिम टप्प्यात आहे.

अहिल्यानगर-बीड-परळी मार्ग मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर स्थानिक व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसेच प्रवासाचा वेळ आणि पैसा देखील वाचणार आहे.

## गुगल पे कडून 'पॉकेट मनी' फीचर लॉन्च; आता मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सुरक्षित डिजिटल व्यवहार शक्य

**मुंबई/प्रतिनिधी :** गुगल पे ने 'पॉकेट मनी' नावाचे एक नवीन फीचर लॉन्च केले आहे. 'पॉकेट मनी' हे फीचर भारतीय राष्ट्रीय पेमेंट्स महामंडळ (एनपीसीआय) द्वारे विकसित करण्यात आलेल्या 'यूपीआय सर्कल' या सुरक्षित तंत्रज्ञानावर आधारित आहे. हे फीचर पूर्णपणे अधिकृत असून भारतीय डिजिटल पेमेंट्स प्रणालीच्या सर्व नियमांचे पालन करून तयार करण्यात आले आहे. त्यामुळे यामध्ये कोणत्याही प्रकारचा सायबर धोका नसून उलट व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठीच हे फीचर तयार करण्यात आले आहे.

गुगल पे हे 'यूपीआय सर्कल'च्या अंतर्गत काम करते. 'यूपीआय सर्कल' म्हणजे असे एक तंत्रज्ञान आहे ज्याद्वारे एखादी व्यक्ती, ज्याच्याकडे स्वतःचे बँक खाते आहे, ती आपल्या खात्यातून दुसऱ्या व्यक्तीला व्यवहार करण्याची परवानगी देऊ शकते. या प्रक्रियेत प्राथमिक वापरकर्ता म्हणजे ज्याचे बँक खाते गुगल पेला जोडलेले आहे, तो संपूर्ण नियंत्रण ठेवतो. तर दुय्यम वापरकर्ता म्हणजे ज्याच्याकडे स्वतःचे बँक खाते नसते, जसे की लहान मुले, ज्येष्ठ नागरिक किंवा घरातील मदतनीस, ते या परवानगीच्या माध्यमातून व्यवहार करू शकतात.


या फीचरचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्यातील नियंत्रण यंत्रणा. प्राथमिक वापरकर्ता आपल्या गरजेनुसार खर्चाची मर्यादा ठरवू शकतो. उदाहरणार्थ, महिन्याला जास्तीत जास्त १५ हजार रुपयांची मर्यादा सेट करता येते. या मर्यादेत दुय्यम वापरकर्ता सहज व्यवहार करू शकतो. मात्र, जर ही मर्यादा सेट केली नसेल, तर प्रत्येक व्यवहारासाठी प्राथमिक वापरकर्त्याची मंजुरी आवश्यक असते. अशा वेळी प्रत्येक पेमेंटपूर्वी रिक्वेस्ट येते आणि यूपीआय पिन टाकल्यानंतरच व्यवहार पूर्ण होतो. त्यामुळे वापरकर्त्याच्या परवानगीशिवाय एक रुपयाही खात्यातून जात नाही.

या फीचरमध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे केवायसी प्रक्रिया. दुय्यम वापरकर्त्याची ओळख पटवणे बंधनकारक असल्याने कोणत्याही प्रकारच्या गैरवापराला आळा बसतो. ही माहिती केवळ बँक आणि संबंधित यंत्रणांकडे सुरक्षित राहते आणि भविष्यातील कोणत्याही चौकशीसाठी उपयोगी ठरते.

तसेच, एका प्राथमिक वापरकर्त्याला जास्तीत जास्त पाच दुय्यम वापरकर्ते जोडण्याची सुविधा दिली आहे. यामुळे संपूर्ण कुटुंबासाठी हे फीचर उपयुक्त ठरते. विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी हे फीचर मोठे वरदान ठरू शकते, कारण त्यांना डिजिटल व्यवहार करताना सुरक्षिततेची हमी मिळते. त्याचप्रमाणे लहान मुलांना नियंत्रित स्वरूपात डिजिटल पेमेंट्सची सवय लावण्यासाठीही हे फीचर उपयोगी आहे.

तज्ञांच्या मते, सायबर फसवणूक टाळण्यासाठी या फीचरचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून आलेली 'यूपीआय सर्कल' रिक्वेस्ट स्वीकारू नये आणि फक्त विश्वासू व ओळखीच्या व्यक्तींनाच जोडावे. तसेच कोणताही व्यवहार मंजूर करताना काळजीपूर्वक तपासणी करणे गरजेचे आहे.

## मातंग समाजाच्या राजकीय सक्षमीकरणाला नवी दिशा; डॉ. वसंत डावरे यांना पीएच.डी. पदवी



**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक शास्त्र क्षेत्रात अभिमानाची नोंद करत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे राज्यशास्त्र विषयात डॉ. वसंत रंगनाथ डावरे यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी प्रदान करण्यात आली. हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

डॉ. डावरे यांनी पंचायत राज व्यवस्थेत मातंग समाजाचा राजकारणातील सहभाग या विषयावर सखोल संशोधन पूर्ण केले असून, या संशोधनासाठी प्रा. डॉ. रमेश रा. बेनवाड (माजी विभागप्रमुख, नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी) यांचे मार्गदर्शन लाभले.

या संशोधनातून मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संघर्षाचे वास्तव चित्रण करण्यात आले आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून हा समाज मुख्य प्रवाहात कसा सहभागी होऊ शकतो, याचे प्रभावी विश्लेषण डॉ. डावरे यांनी मांडले आहे.

तसेच साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक चळवळीतील योगदानावरही त्यांनी विशेष कार्य केले आहे. त्यांच्या विचारांमुळे तळागाळातील समाज एकत्र येऊन मातंग समाजाला नवी ओळख व दिशा मिळाल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या यशाबद्दल विद्यापीठ प्रशासन, शिक्षकवृंद, संशोधक सहकारी तसेच समाजातील विविध स्तरांतून डॉ. डावरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

त्यांच्या या यशामुळे मातंग समाजात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, पुढील वाटचालीसाठी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भोंदुला मदत करणारे सहआरोपी केले पाहिजेत !

भोंदू अशोक खरात हा तर अट्टल भोंदू निघाला आहे. त्याचे कारनामे उघड पडत असल्याने त्याच्याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे. आता न्याय देवतावर विश्वास असून तीच न्याय देण्याचे काम करणार आहे. यावेळी एका नंतर एक केलेले कारनामे बाहेर येत आहेत. जनतेचे डोळे उघडे पडू लागले. खरात एवढा पोंहचलेला आहे या बाबत आश्चर्य व्क्त केले जात आहे. मुळात आता अशोक खराताने केलेल्या कारनाम्यातून तो सुटणार नाही हे जवळपास निश्चित दिसून येत आहे.त्याला ही आता जाण झाली असून जेल मध्येच अंतिम काळापर्यंत राहाणार अशी खंत व्यक्त केली आहे. पापाचा घडा भरल्यावर सत्य बाहेर येत आहे, चौकशावर चौकशा होत असल्याने गुन्हा सिद्ध होण्यात वेळ लागणार आहे. दिवसेंन दिवस त्याने केलेल्या कारनामे पोलिस चौकशीत उघडे पाडत आहेत. अतिषय घृणास्पद कार्य त्याच्या हातून झाले आहे. त्यामुळे शिक्षा ही कठोरातील कठोर झाली पाहिजे असे सर्वांना वाटणे स्वाभाविक आहे. त्याचे किस्से मन सुन्न करणारे आहेत. नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणात गुरुवारी, ता. ९ काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अशोक खरात विरोधात पुरावे संकलित करण्याच्या कामाने वेग घेतला आहे. अशोक खरातच्या तपासात तब्बल १६० जीबी डिजिटल पुरावे तपास यंत्रणांनी गोळा केल्याची माहिती समोर आली आहे. डिजिटल पुराव्यातून खरातच्या काळ्या कारनाम्यांचा भांडाफोड होणार आहे. फॉरेन्सिक अहवाल एसआयटीकडे सादर केल्यानंतर आता तपासाला आणखी वेग आला आहे. एकूण ४ डिजिटल उपकरणांची तपासणी पूर्ण झाली आहे. पुराव्यांमुळे खरातभोवतीचा कारवाईचा फास अधिक घट्ट झाला आहे. प्रत्येक पुराव्याला कोडवर्ड, मध्ये लैंगिक अत्याचाराचे गंभीर संकेत दिले आहे. नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ कालावधीतील हालचालींचा तपशील हा कॅनडा कॉर्नर कार्यालयातून जप्त करण्यात आला आहे. ३२ जीबी क्षमतेचे तसेच १९ फोल्डर डेटा असणारे ३ पेन ड्राईव्ह तसेच ६४ जीबी क्षमतेचे ओटीजी पेन ड्राइव्ह आणि लॅपटॉपसह सर्व डेटा एसआयटी कडून स्कॅन करण्यात येत आहे. फोरेन्सिक आणि सायबर टीम कडून सबळ डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत. न्यायालयात पुरावे सादर करण्यासाठी एसआयटीने साक्षीदार आणि पिढीताचे जबाबही नोंदविण्यात आले आहे. वेगवेगळ्या अशा एकूण १६० जीबीच्या डिजिटल पुराव्यांमध्ये खरातचे हे काळे कारनामे दडले असून, खरातच्या गळ्याभोवतीचा फास या पुराव्यांमुळे घट्ट झाला आहे. तपासणीदरम्यान प्रत्येक डिजिटल पुराव्यावर पोलिसांनी कांही कोडवर्ड दिले असून, त्यात ए म्हणजे खरातने केलेल्या लैंगिक अत्याचाराचे पुरावे असल्याची माहिती आहे. त्याचबरोबर नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत कॅनडा कॉर्नर येथील खरातच्या कार्यालयात केले गेलेले काळे कारनामे पोलिसांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत. भोंदू अशोक खरातला तिसऱ्या गुन्ह्यात पाच दिवसांची पोलिस कोठडी नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने सुनावली आहे. गुरुवारी (दि.९) झालेल्या सुनावणीत खरातने पीडितेला कसे आपल्या जाळ्यात ओढले, हे सांगताना खरातने तुला मुलगाच होईल, असे सांगत गर्भवतीला संबंध ठेवायला भाग पडल्याचा आरोप वकिलांनी केला. त्यानंतर न्यायालयाने खरातला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. भारतात शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे. खरातच्या जाळ्यात आडकलेले बहुतांशी हे शिक्षित मंडळी आहे असे दिसून येते. विज्ञानाची साथ घेवुन चालणारी सुशिक्षित मंडळी व उच्च राजकारणी असलेले मंडळीचा वावर हा खरात भोवती अधिक होता. मुळात खरात प्रकरणी जे कोणी साथीदार असतील तर त्यालासह आरोपी केले पाहिजे. शिक्षा होईल किंवा नाही ही मात्र त्याची चौकशी होणे आवश्यक वाटते. जनतेचा न्यायप्रक्रिये बाबत विश्वास वाढण्यासाठी सोबती, सहकारी व मदतनीस यांची चौकशी व सहआरोपी करणे काळाची गरज आहे. एवढ्या मोठया कारस्थानात हा एकटा काम करणे शक्य नाही. अनेक प्रकाराच्या उलाढाली केल्याचे दिसून येत आहे. चौकशी चालू आहे. खरात जेलमध्ये आहे. खरातचे बँक खात्यात संशयस्पद व्यवहार आढळल्यास बँकावर कारवाई होणे, सहआरोपी करणे आवश्यक वाटते. दिवस उजेडला की, त्याच्या बाबत नवीन माहिती मिळत आहे. अनेक दिवसापासून त्याचे गैरप्रकार चालू होते. बँकेत अनेक खाते आहेत. हा चुकीचा मार्ग आवलंब करीत असलेल्या बाबत बँकांना कशी कल्पना मिळाली नसेल? एखादा जनसामान्य व्यक्ती खाते उघडायाला केल्यास अनेक चौकशा व कागदपत्र तपासली जातात. ऑनलाईन तपशील पाहिली जातो. असे असताना ज्या बँका खरातच्या सलग्न आहेत. सहभागी आहेत. चुकीची साथ दिली आहे त्यांच्यावरसुद्धा गुन्हा नोंदविला पाहिजे. कटात सहभाग असल्याचा संशय व्यक्त करून गुन्हा तरी नोंदविला पाहिजे. तपासात जे काही उघडे पडेल ते पडेल, मात्र चौकशी तरी झाली पाहीजे. चौकशीच होणार नसेल तर इतरही असा प्रकाराचे धाडस करू शकतील, मुळात एवढे मोठे कारस्थान उघडे पडत असल्याने त्याचे साथीदार असले पाहिजेत. एकतर मोठी व्यक्ती किंवा मोठा राजकारणी सोबत असला पाहिजे असा अंदाज दिसून येत आहे. मोठे कारस्थान उघडे पडत आहे. अजून चौकशी होत आहे. खरातवर गुन्हे दाखल झाला आहे. पिडीत समोर येत आहेत. अशा स्थितीत पिडीतास संरक्षण दिले पाहिजे. त्याच प्रमाणे सोबती, सहकारी कोण आहे हेही उघडे पडले पाहिजे. मुळात आता पर्यंत त्याने केलेले काम गंभीर स्वरूपाचे आहे. विविध चौकशासमिती काम करीत असल्याने बरेच काही बाहेर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यावरील आरोपाचे स्वरूप पाहिले तर यात इतरही साथीदार गुंतले असल्याचे वाटणे स्वाभाविक आहे. एवढे मोठे कांड एकट्याने करणे अशक्य वाटते. त्याने एक असे प्रयोग केले नाहीत तर अनेक असे प्रकार प्रभावित टाकणारे केले आहेत. जनतेला फसविण्यासाठी अनेक प्रकाराचा आवलंब केला आहे. त्यामुळे सखोल चौकशी तर होतच आहे, त्याबरोबर खरातच्या चौकशी दरम्यान जे काही साथीदार आहेत त्यांना सहआरोपी करणे योग्य वाटते. त्यांच्यावर गुन्हा नोंदविणे योग्य ठरणारे आहे. त्यामुळे सत्य काय ते बाहेर आले पाहिजे. त्यापेक्षा अशा प्रकारात कोणी पुन्हा आडकू नये, चुकीचा मार्गावर चालण्याचे धाडस कोणी करू नये अशी अद्दल घडली पाहिजे. यासाठी सर्वांनी सावध असणे आवश्यकच आहे.

# शिक्षण,साहित्याच्या गावचा कणखर माणूस: ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते

लातूरच्या मातीने अनेक साहित्यिक, राजकारणी,उद्योजक,सामाजिक कार्यकर्ते, शेतीनिष्ठ शेतकरी, सहकाराच्या क्षेत्रात दूरदृष्टीने दबदबा निर्माण करणारे, शिक्षणाचा लातूर पॅटर्न निर्माण करणारे श्रमर्षी जन्माला घातले.अशात कसलीही गटबाजी, जात, धर्मकारण न करता माणसांच्या गावात, माणूसकीसाठी संघर्ष करणारे, रोखठोक, निर्भिडपणे बोलणारे, स्पष्टवक्ते, वात्रटिकाकार, कवी, कथाकार, लेखक, समीक्षक, उदार मनाचा,

निर्व्यसनी, निगर्वी, साहित्यातले ज्येष्ठ लेखक व आदर्श शिक्षक भारत सातपुते यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ते आज गुरुवार, दि.९ एप्रिल २०२६ रोजी वयाची ६४ वर्षे पूर्ण करुन पासष्टीमध्ये जात आहेत, यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वावर टाकलेला हा अभिष्ठचिंतनपर लेखप्रपंच..


भारत सातपुते यांना लहानपणापासूनच कबड्डी,खो-खो,हॉलिबॉल,कॅरम,चेस,सुरपट आदी खेळांची आवड असून,त्यामुळे त्यांच्या जगण्यात सरळ साधेपणा, पण तत्वाशी तडजोड न करता बरंपेक्षा खरं बोलण्यावर त्यांचा भर असतो.आपल्याला राजकीय पाठबळ असलं तरी वैयक्तिक लाभासाठी कधी गैर फायदा उचलल्याचे दिसत नाही.

गातेगाव,ता.लातूर येथील कष्टकरी गोंधळी समाजातील,निरक्षर आई काशीबाई आणि अल्पसाक्षर वडील मुरलीधर या जोडप्यांच्या पोटी चार मुले आणि एक मुलगी ही अपत्ये जन्माला आली.त्यामध्ये भारत थोरले आहेत. वडिलांनी शिक्षणाचं महत्व जाणल्याने त्यांनी आपल्या सर्वच पाल्यांना जाणीवपूर्वक शाळेचे दार दाखवून साक्षर केले.त्यातील एक माहिती कार्यालयात वाहन चालक राहिले. एक कृषी खात्यात नोकरीला होते.आणखी एक भाऊ जिल्हा परिषद शाळेत कार्यरत आहेत. बहिण रेनापुर ला दिलेली आहे. या लेखकास एक मुलगा व दोन मुली आहेत त्यातील डॉ. सुशील हा छत्रपती संभाजी नगरच्या कृषी महाविद्यालयात प्राध्यापक असून ते एम. एस. सी. ॲग्री. पीएचडी आहेत. कीर्ती नावाची एक मुलगी ही पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापिका आहे. तर दुसरी मुलगी सांगलीच्या एका खाजगी कंपनीत नोकरी करते.

भारत सातपुते यांचा दि.९ एप्रिल १९६२ रोजी गातेगाव या गावी जन्म झाला.त्यांचे गावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण झाले.इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत गावातीलच खाजगी व्यंकटेश माध्यमिक विद्यालयातून शिक्षण पूर्ण केले.सन १९७८ मध्ये ते ५४ टक्के गुणांनी दहावी उत्तीर्ण झाले. तेव्हा ते शाळेत पहिले आले होते. दहावी नंतर उन्हाळी सुट्टीत करायचे काय ? तर घरची परिस्थिती बिकट,पुढचे शिक्षण घेताना लागणारे कपडे, पेटीसाठी पैशाची तजवीज करणे आवश्यक होते म्हणून वडिलांनी काहीतरी काम करण्यास सांगितले. मग भारत यांनीही हो काही तरी केलेच पाहिजे यासाठी त्यांनी जवळच्या गावातील दुधवाल्याच्या सायकलवरुन दुध वाटप करण्याचे काम धरले. या कामातून मिळणाऱ्या पैशातून साठ रुपयांची एक सायकलही घेता येईल या हेतूने ते काम करुन लागले. पण थोडा लवकर आणि अधिक पैसा मिळावा म्हणून आगावपणा करावा वाटला आणि त्यांनी दुधात पाणी मिसळून द्यायला चालू केले.एकदा त्या दिवशी घागरी निसटल्या आणि सगळं दूधच मातीत गेलं. त्याची भरपाई करावी लागली.सायकलही गेली आणि कमाईही मातीत गेली. त्यादिवशी पासून भारत सातपुते यांनी आयुष्यात पुन्हा बेईमानी करायची नाही हे ठरवून टाकले.

### असा झाला सेवारंभ

शैक्षणिक वर्ष सुरु झाले आणि त्याकाळी दहावीनंतर शिक्षकीपेशासाठी डी.एड.शिक्षणाला महत्व होते. ते खाजगी आणि शासकीय दोन्ही स्तरावरुन करता येत असे,भारतनी शासकीय अध्यापक विद्यालयाच्या प्रवेशासाठी अर्ज केला आणि त्यात त्यांचा नंबर लागून गेला.आजच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या वरच्या मजल्यावरील शासकीय अध्यापक विद्यालयातून त्यांनी दोन वर्षांचा डी.एड.कोर्स पूर्ण केला.घरची परिस्थिती हालाखीची असल्याने वडिलांनी त्यांना बरं आता जास्त शिक्षण नको, नोकरीचं बघा असा सल्ला दिला.तो सिरसावंद्य मानून ते त्या दिशेने प्रयत्न करत राहिले.त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची लिपीक पदाची परीक्षा दिली. त्यात त्यांना यश आले आणि मुंबई मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागात ते सेवेत दाखल झाले. त्यावेळी लातूरचे आ.विलासराव देशमुख यांच्या आमदार निवासाच्या रुममध्ये त्यांनी आपला मुक्काम ठेवला आणि सेवा चालू केली.पण इथं त्यांचं मन लागेना म्हणून आ.विलासरावांच्या मदतीने लातूरला बदलीचा प्रयत्न केला मात्र त्यावेळीही बदलीसाठी किमान एका ठिकाणी तीन वर्षे सेवा करणे आवश्यक होते. म्हणून कसे तरी कार्यरत राहिले. त्यांचे डी.एड. झाल्याने शिक्षकी पेशासाठी प्रयत्न चालू होतेच अन् त्यांना उस्मानाबाद जिल्हा परिषदेचा कॉल आला आणि निवडही झाली.त्यांना पहिल्यांदा लातूर तालुक्यातील भातांगळी जिल्हा परिषद शाळेवर शिक्षण होण्याची ऑर्डरही आली.१४ एप्रिल १९८२ या सुट्टीच्या दिवशी ते शाळेवर रुजू झाले.तिथे पाच वर्षे ते कार्यरत होते.विशेष म्हणजे पुढे त्यांनी शिक्षकी सेवेत सतत सुट्ट्यातही काम केले. अपवादात्मक परिस्थितीत कधीतरी रजा घेतली आहे. त्यांनी सुट्ट्यातही ज्ञानार्जन केले आहे. पुढे त्यांची हरंगुळ ता.लातूर येथे बदली झाली. दोन वर्षानंतर त्यांना साक्षरता अभियानात प्रतिनियुक्तीवर समन्वयक म्हणून कामाची संधी मिळाली. नंतर खुलगापूर येथे सलग आठ वर्षे त्यांनी प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणून काम


कवी भारत

केले. जिल्हा परिषदेने त्यांना पुन्हा सर्वशिक्षा अभियानात कामाची जबाबदारी सोपवली. नंतर त्यांना पदोन्नतीने निलंगा जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत दाखल व्हावे लागले. तिथे त्यांची पाच वर्षे सेवा झाली,तिथून त्यांना भादा जिल्हा परिषद शाळेत बदलीने जावे लागले. नोकरीच्या गावात मुख्यालयी राहून आणि तीही पाच वर्ष कसलीही सुट्टी न घेता ज्ञानदानाचे काम त्यांनी केले. नियत वयोमानाप्रमाणे एप्रिल २०२० मध्ये त्यांनी निवृत्ती स्वीकारली.

### कॉपीमुक्त शिक्षण,भ्रष्टाचारमुक्त कारभार

भारत सातपुते यांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना केवळ अध्यापन केले नाही तर विद्यार्थी,पालक आणि परिसर हा व्यसनमुक्त राहण्यासाठी प्रयत्न केले.सातवी,दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत कॉपी होणार नाही,विद्यार्थी अभ्यासू घडावेत यावर त्यांनी कटाक्षाने भर दिला. बैठे पथक,भरारी पथक,परिरक्षक,परिक्षा केंद्र प्रमुख म्हणून काम करताना त्यांनी कॉपीला थारा दिला नाही.ज्या परिक्षा केंद्राचा पूर्वी शंभर टक्के निकाल लागत होता.तिथे भारत सातपुते यांच्या पर्यवेक्षणामुळे २५ टक्क्यांच्या पुढे सरकू शकला नाही,जवळपास शंभर विद्यार्थ्यांना त्यांनी रेस्टीकेट केले. दुसऱ्यांच्या नावावर परीक्षा देणाऱ्या सात मुलांवर तोतयेगिरीच्या केसेस केल्या. यामुळे त्या भागातील खवळलेल्या कॉपीप्रेमींनी त्यांच्याविरोधात खोट्या तक्रारी,पोलिसांत गुन्हे दाखल केले.कर नाही तर त्याला डर कसला या उक्तीप्रमाणे त्यावर ते तसूभरही न ढळता त्या प्रकरणांना सामोरे गेले आणि ते दोषमुक्तही झाले.भ्रष्टाचाराचाही त्यांना खुपच तिटकारा आहे.दोघा-तिघांना त्यांनी लाचलुचपत विभागाचा झटका दाखविला.अगदी महिला दिनी एका कर्मचाऱ्यांना ॲन्टीकरप्शनच्या जाळ्यात दिले.त्यांची अस्सल कारकिर्द अनेकांच्या गैरसोयीची असल्याने त्यांच्या वाहनावर हल्लेही झाले पण त्यांना ते डगमगले नाहीत.

### उपक्रमशील गुरुजी

खडू,पुस्तक, फळा,हजेरी एवढ्यापुरते भारत सातपुते शिक्षक म्हणून काम करत नव्हते,त्यांची ज्या ज्या ठिकाणी बदली झाली,तिथे तिथे गेल्यानंतर पर्यावरण पूरक,अल्हाददायक वातावरण होण्यासाठी त्या परिसरात त्यांनी वृक्षांची,केशरआंब्याची लागवड आणि संगोपण करुन आज ती फळा-फुलांपर्यंत झाडे आणली आहेत. ते नवनवे उपक्रम हाती घेत असतात. स्काउट गाईड,वृक्षरोपण,शैक्षणिक साधन निर्मिती,शिक्षकांसाठी विविध प्रशिक्षणे त्यात साधन व्यक्ती म्हणून त्यांनी योगदान दिले आहे.

### शिक्षणाची शिखरे सर

बहुतांश प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक शिक्षक म्हणून समाधान असते.त्यातल्या त्यात नोकरी आणि छोकरी झाले की बस्स.. पुढचे उच्च शिक्षण व शैक्षणिक पात्रता हशील करण्यात त्यांना स्वारस्य नसते .भारत सातपुते त्याला अपवाद राहिले.नोकरीच्या आरंभी केवळ दहावी डी.एड.असलेल्या सातपुते सरांनी आपल्या खात्याच्या परवानगीने पुढील शिक्षणाची आपली वाटचाल सतत चालूच ठेवली.त्यांनी बी.ए.,मराठीत एम.ए.,बी. एड.,डीएई.एम.एड.अशा शिक्षण क्षेत्रातल्या पदव्या संपादन केल्या.अगदी गेल्या महिन्यात त्यांच्या शिक्षण,मराठी,हिंदी साहित्य क्षेत्रातील योगदानाची दखल घेवून मध्य प्रदेशातील बालाघाटाच्या इतिहास व पुरातत्व संशोधन मंडळाने डि,लीट.पदवी सन्मानपूर्वक बहाल केली आहे.शिक्षणाविषयी त्यांना प्रचंड आस्था असल्याने ते उंच शिखरापर्यंत गेले आहेत. अशी असली तरी त्यांचे पाय नेहमी जमिनीवर असतात . साधी राहणी व उच्च विचारसरणी असा त्यांचा प्रभाव आहे. सेवानिवृत्तीनंतरही ते गप्प नाहीत मिळणाऱ्या पेन्शन मधून काहीतरी काम केले पाहिजे असे तिला वाटते त्यामुळे ते आजही परिस्थितीमुळे शाळाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी धडपडत असतात.

### जे जे साठलं मनात
### ते ते कोरलं पानांत..

रुढार्थाने भारत सातपुते केवळ शिक्षकी पेशापूरते मर्यादित राहिले नाहीत.साहित्य त्यांचा श्वास आहे.आरंभीच्या काळात चारोळ्या,वात्रटिका साहित्य प्रकारात उडी घेणाऱ्या या साहित्यिकाने साहित्याच्या फांद्याफांद्यांवर चढाई केली.त्या काळात पुस्तकासाठी सोसायटीचं कर्ज काढून त्यांनी १९८६ पहिला जगणं माणसांचं हा कवितेचा ग्रंथ प्रकाशित केला.पुढे ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांचं नाव भारत असल्याने कदाचित त्यांना भारतभर विस्तारायचं होत की काय माहित नाही पण झालं तसंच,त्यांनी साहित्य प्रांतात अक्षरशःधुडघूसच घातला.त्यांच्या नावावर १२ कविता संग्रह,१० वात्रटिका ग्रंथ, ७ कथासंग्रह, बालासाहित्यवरची ६ ग्रंथसंपदा, ५ व्यक्तीचित्रे, त्यांच्या साहित्यावर ६ पुस्तके,जागरण हे ६१वे आत्मचरित्र पुस्तके,त्यावर तब्बल ७२० पानांचा मराठी साहित्य क्षेत्रातील कदाचित मोठा दीर्घ असा भारत पर्व नावाचा समीक्षा ग्रंथ संपादन झाला आहे.त्यांच्या जागरण आत्मचरित्राचा हिंदीत अनुवाद जागर नावाने प्रकाशित आहे.अहो त्यांच्या जन्माच्या बरोबरीने ही ग्रंथ मालिका ६१.. विशेष म्हणजे सेवानिवृत्तीनंतर त्यांनी एकाच दिवशी आपल्या १५ ग्रंथांचे प्रकाशन करुन साहित्य क्षेत्रावर वर्चव सिध्द केले.त्यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी गिनिस बुकात याची नोंद व्हायला पाहिजे असा गौरव केला होता. त्यांनी जवळपास ८० लेखकांच्या ग्रंथांना प्रस्तावना दिलेली आहे.हजारो ठिकाणी विविध विषयांवर व्याख्याने देवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे.शेकडो कवीसंमेलनाचे खुमासदार, हलक्या फुलक्या शैलीत त्यांनी सूत्रसंचालन केले आहे.त्यांच्या कवितांचे हिंदी,इंग्रजीमध्ये भाषांतर झालेले आहे. सातपुते सरांनी एकमत,लोकमत,लोकपत्र, मराठवाडा,मराठवाडानेता,संचार,लोकमन, राजधर्म,यशवंत,सिध्देश्वर समाचार,संवाद देशभक्त आदी लोकप्रिय दैनिकांमधून साहित्य लेखन केले आहे.माणसांच्या जीवनाच्या वाटचालीत अनेकांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हात लागलेला असतो,आपल्या जीवनात दिवंगत नेते विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख, डॉ.ना.य.डोळे,प्रा.सुभाष वारे, डॉ.नागोराव कुंभार, डॉ.सोमनाथ रोडे,प्राचार्य शिवाजीराव पाटील,माजी आ.पाशा पटेल,माधव बावगे,मराठवाडा नेताचे संपादक रामेश्वर बद्दर,मुख्याध्यापक पी.जी.भिसे आदींचे योगदान राहिले असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

### साहित्य वारसा जपणारे घर

गुरुजींच्या साहित्य आणि शैक्षणिक ध्यासाचा प्रभाव त्यांच्या अख्ख्या परिवारावर आहे. त्यांचा पत्नी सुषमा सातपुते यांनाही कविता लेखनाचा छंद आहे.सातपुते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी पत्नीला, बोल तुला काय दाग-दागिणे करायचे, असे विचारले असता,त्यांनी माझ्या गळ्यात मणी मंगळसूत्र,त्याच्याशिवाय अन्य दागिणा नको, पण माझ्या निवडक कवितांचा कवितासंग्रह प्रकाशित करा असा शब्द टाकला आणि त्यांनी त्यांचा उनसावली हा कवितासंग्रह २०२१ मध्ये प्रकाशित केला. छत्रपती संभाजी नगरच्या ॲग्री कॉलेजमध्ये प्राध्यापक असलेले त्यांचे डॉ. सुशील या सुपुत्राने ध्यास कविता संग्रह २०२४ मध्ये प्रसिध्द झाला. त्यांची एम.ई. असलेली कन्या कीर्ती ठाकूर ही पुणेच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्राध्यापिका आहे. दुसरी एमसीएस शिक्षित कविता मोहिते ही कन्या सांगलीतील खाजगी कंपनीत कार्यरत आहे. मुला-मुलींची नातवंडे ही उच्च शिक्षणाच्या मार्गावर वाटचाल करत आहेत.

### जन्माच्या दुप्पट पुरस्कार

अलिकडे पैसा द्या आणि पुरस्कार घ्या असा पुरस्कार करमणूक प्रकार रुढ होत असला तरी भारत सातपुते त्याला अपवाद ठरले आहेत,कोणा संस्था व संघटनेला एक पैसाही न देता त्यांना केंद्र शासन, राज्य,शासन,विविध साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक संस्थांचे मिळून १२२ पुरस्कार आजपर्यंत लाभले आहेत,ती सन्मानचिन्हे त्यांच्या घराच्या एका खोलीत येणाऱ्यांचं लक्ष वेधून घेतात.

त्यांच्या वैविध्यपूर्ण कामगिरीचा अनेकांना मोह पडला तर नवल नाही..त्यांना अनेक संस्थांवर काम करण्याची संधी मिळाली. लातूर मराठवाडा साहित्य परिषदेचे पाच वर्षे जिल्हाध्यक्षपद भूषविले आहे. अखिल भारतीय बाल साहित्य संस्थाचे ते अध्यक्ष आहेत. लातूरच्या ज्ञान प्रकाश ग्रंथालयचे ते अध्यक्ष आहेत.अनेक सार्वजनिक ग्रंथालये,शाळा,महाविद्यालयांना त्यांनी आपली मोफत ग्रंथसंपदा भेट दिली आहे.

### जन्म गोंधळ्याघरी
### पण शुध्द शाकाहारी

माणसाचं मन प्रसन्न राहण्यासाठी, चिंतनशील, सकारात्मक विचारांची वाढ होण्यासाठी विपश्यना करणे त्यांना आवश्यक वाटते,त्यासाठी त्यांनी १२-१२ दिवसांची पाच विपश्यना शिबीरे इगतपूरी येथे केलेली आहेत. आळस त्यांच्या गावी नाही, अगदी सकाळी ३ ते ५ वाजेच्या दरम्यान त्यांचा लेखनप्रपंच चालतो,साडेपाच वाजता ते गुळ,आद्रक आर्दीचा काढा घेतात.सकाळी ज्येष्ठांसोबत १ तास फिरायला जातात.८ वाजता फळांचा रस घेतात.९.३० वाजता जेवण...अधी मधी काही खायचे नाही.पण दिवस मावळण्यापूर्वी रात्रीचे भोजन उरकत असतात.मी गोंधळ्याच्या मांसाहारी कुटुंबात जन्मलो तरी मी शुध्द शाकाहारी असल्याचे आवर्जून सांगतात. गव्हाचे,भात कमी अन्न,पण बडी ज्वारी, पिवळी, बाजरीची भाकरी,गावाकडच्या तांदुळजा,कुंजूरगा,पातर अशा पालेभाज्या त्यांचे खास आवडीचे खाद्य आहे.

दाढदुखी झालेल्या आईला पुढे दाताचा कर्करोग झाल्याचे निदान झाले,त्यातच तिने अखेरचा श्वास घेतल्याची दुःखद घटना, आपल्या आयुष्यात दुःखदायक क्षण असल्याचे सांगतात. समाजातील वाढती व्यवसाधिनता त्यांना वेदना देते आणि व्यवनमुक्तीसाठी कार्य करायचे राहून गेल्याची त्यांची खंत आहे. ही खंत ते आजही लेखनातून चळवळीतून पूर्ण करत आहेत. तथापि माझ्या घरात कथा,कविता करणारे निपजले याचा मनस्वी आनंद असल्यो ते म्हणाले.

लातूरच्या प्रकाश नगरातील विजय या दुमजलीत वास्तव्यास असणारे साहित्य, शिक्षण, समाज, पर्यावरण, माणूस प्रेमी भारत सातपुते आज वयाच्या पासष्टीत पदार्पण करीत आहेत.म्हणून-

मुरलीधरचा धन्य पुत्र भारत
गुरुजी शोभला जगी भारती,
मानवी मूल्यांसाठी जगणारे
व्हावेत इथे कैक सारथी..

# संकटात सापडलेल्या महिलांचा हक्काचा आधार : सखी वन स्टॉप सेंटर




अन्यायाविरुद्ध लढण्याचं बळ जेव्हा संपतं, तेव्हा मदतीचा एक हातही खूप मोलाचा ठरतो. महिलांच्या आयुष्यातील असाच एक हक्काचा आणि विश्वासाचा हात म्हणजे लातूर येथे कार्यरत असलेले सखी वन स्टॉप सेंटर. घरगुती हिंसाचार असो वा सामाजिक अन्याय, कोणत्याही संकटात सापडलेल्या महिलेला एकाच छताखाली सर्व मदत देणारे हे केंद्र आज लातूर जिल्ह्यातील शेकडो महिलांसाठी खऱ्या अर्थाने सखी ठरले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना आदराचे स्थान असले तरी, आजही काही महिलांना घराच्या उंबरठ्याआड किंवा सार्वजनिक ठिकाणी विविध प्रकारच्या हिंसाचाराचा सामना करावा लागतो. अशा वेळी 'कुणाकडे दाद मागावी?' हा प्रश्न पीडितेसमोर डोंगरासारखा उभा असतो. याच प्रश्नाचे उत्तर म्हणून भारत सरकारने वन स्टॉप सेंटर अर्थात सखी केंद्र ही संकल्पना अंमलात आणली. लातूर येथे २० जून २०२० रोजी सखी केंद्राची स्थापना झाली आणि अवघ्या काही वर्षांतच हे केंद्र अन्यायग्रस्त महिलांच्या जीवनातील अंधार दूर करणारे दीपस्तंभ ठरले आहे.

### विविध सेवा एकाच ठिकाणी

वन स्टॉप सेंटरचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील एकात्मिक सेवा. पीडित महिलेला तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशन, उपचारांसाठी रुग्णालय आणि सल्ल्यासाठी वकिलांकडे अशी पायपीट करण्याची गरज उरत नाही. लातूरच्या या केंद्रात वैद्यकीय मदत, पोलीस साहाय्य, कायदेशीर सल्ला, मानसिक समुपदेशन आणि तात्पुरता निवारा अशा पाचही महत्त्वाच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध आहेत. तातडीच्या प्रसंगी महिलांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे साक्ष नोंदवण्याची किंवा तज्ज्ञांशी संवाद साधण्याची सुविधाही येथे सज्ज आहे.

### कौटुंबिक हिंसाचार कायदा:
### महिलांचे कायदेशीर कवच

'वन स्टॉप सेंटर' या केंद्राचे कार्य कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या आधारे चालते. या कायद्याची व्याप्ती केवळ शारीरिक मारहाणीपुरती मर्यादित नाही. जर एखाद्या महिलेचा शाब्दिक अपमान होत असेल, तिला आर्थिकदृष्ट्या परावलंबी ठेवले जात असेल, तिचे स्त्रीधन हिरावले जात असेल किंवा तिला भावनात्मक स्तरावर त्रास दिला जात असेल, तर तो सर्व कौटुंबिक छळ मानला जातो. या अधिनियमांतर्गत लातूरचे सखी केंद्र पीडित महिलांना न्यायालयाकडून संरक्षण आदेश (कलम १८), निवासाचा हक्क (कलम १९), आर्थिक साहाय्य (कलम २०) आणि मुलांचा तात्पुरता ताबा (कलम २१) मिळवून देण्यासाठी तांत्रिक व कायदेशीर पाठबळ पुरवते.

लातूर येथील सखी केंद्राने गेल्या पावणेचार वर्षांत केलेल्या कामगिरीचा आलेख अतिशय प्रभावी आहे. केंद्रात आतापर्यंत ८४५ महिलांनी आपला विश्वास दर्शवला असून, त्या सर्वांचे यशस्वीरीत्या समुपदेशन करण्यात आले आहे. घर सोडून जावे लागलेल्या किंवा असुरक्षित असलेल्या १६६ महिलांना केंद्राने मायेचा आडोसा (तात्पुरता निवारा) दिला. कायदेशीर गुंतागुंतीत अडकलेल्या १२९ महिलांना विधी सल्लागारांनी न्याय मिळवून दिला, तर ९० महिलांना पोलीस दलाच्या मदतीने तत्काळ संरक्षण पुरवण्यात आले. याशिवाय, आरोग्य बिघडलेल्या ६० महिलांना वैद्यकीय उपचार देऊन त्यांना शारीरिकदृष्ट्या सक्षम करण्यात आले. महिला हेल्पलाईन (१८१) वरून आलेल्या ८९ प्रकरणांचा निपटारा करून केंद्राने आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे.

### सखी केंद्रातून खालील
### संकटात मिळते मदत

घरगुती हिंसाचार आणि हुंडाबळी, बलात्कार किंवा लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला किंवा मानवी तस्करी, बाल लैंगिक अत्याचार अंतर्गत येणारी प्रकरणे यासह कोणत्याही संकटात असलेल्या महिलेला सखी केंद्राच्या माध्यमातून मदत उपलब्ध करून दिली जाते.

### मदतीसाठी सदैव तत्पर प्रशासन

लातूरमधील हे केंद्र जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत चालवले जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या प्रशासकीय इमारतीत हे केंद्र कार्यरत असल्याने पीडितांना तेथे पोहोचणे सोपे होते. केवळ शहरातच नव्हे, तर तालुकास्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि जिल्हास्तरावर संरक्षण अधिकारी व विधी सल्लागार यांची विशेष नेमणूक करण्यात आली आहे, जेणेकरून ग्रामीण भागातील महिलांनाही न्यायाचा हक्क मिळणे सोयीचे होईल.

लातूरचे सखी केंद्र हे केवळ सरकारी मदतीचे केंद्र राहिलेले नसून, ते स्त्रियांच्या आत्मसन्मानाचे रक्षण करणारे एक हक्काचे व्यासपीठ बनले आहे. संकटात सापडलेल्या कोणत्याही महिलेने केवळ १८१ या क्रमांकावर डायल केल्यास किंवा केंद्राला भेट दिल्यास, तिला न्यायाची आणि सुरक्षिततेची हमी मिळते.

**- तानाजी घोलप,**
**प्र. जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.

या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे मानसिक आरोग्य हे राज्याच्या उज्ज्वल भविष्याचे पायाभूत तत्व आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आपण बालकांच्या भावनिक आणि मानसिक सक्षमीकरणासाठी एकत्रित प्रयत्न करण्यात येत आहेत.याचा फायदा




भविष्यात होणार असून प्रत्येक बालक आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने आयुष्याचा सामना करू शकेल.

हा करार एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत करण्यात आला आहे.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये केअरगिव्हर-लेड सेल्फ हेल्प ग्रुप्स च्या माध्यमातून मानसिक आरोग्य सेवा अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. ऑफलाइन आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे, जनजागृती वाढवणे आणि मानसिक आजारांबाबतचा कलंक कमी करणे यासाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. हा कार्यक्रम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (डीएमएचपी) सोबत समन्वय साधून राबवला जाणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेला हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थचे संस्थापक-संचालक, डॉ. प्रा. अनिल वर्तक, उपाध्यक्ष प्राची बर्वे, सचिव स्मिता गोडसे, खजिनदार मंजिरी चव्हाण, आजीवन सदस्य संध्या वर्तक यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

## ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पात सायलेंट रिडींग मिशनची सुरुवात





मुलांनी आणि शिक्षकांनी वाचावं यासाठी ज्ञानप्रकाश मध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न होतात. याचाच एक भाग म्हणून महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या येणाऱ्या जयंती निमित्त पालकांसाठी सायलेंट रिडिंग मिशची सुरुवात झाली . तंत्रज्ञानाच्या अतिवापराने आपण आपल्याला आनंद देणाऱ्या मूळ सवयींपासून दूर जात आहोत असे चित्र दिसते. त्यातील एक सवय म्हणजे वाचन. मुलांसोबतच ही सवय पालकांतही रुजली तर घराघरात एक वेगळे चित्र दिसेल आणि येणारी मोठी उन्हाळी सुट्टी पालकांसाठी सुसह्य होईल.

वाचन हे सर्वच वयोगटासाठी सवय बनणे आवश्यक आहे.

कठीण प्रसंगातच नव्हे तर इतर वेळी ही योग्य मार्गाने जाण्यासाठी काय करावे याची दिशा पुस्तके देतात. उत्तम पुस्तके वाचणे हा ज्ञान मिळवण्याचा योग्य मार्ग आहे. हा मार्ग पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी पालक आणि शिक्षकांची आहे. म्हणूनच उत्तम वाचक घडावा या उद्देशाने सायलेंट रीडिंग मिशन हा उपक्रम ज्ञानप्रकाशने हाती घेतला आहे. आज या मिशनमध्ये वाचनात रुची असणारे पालक व शिक्षक सहभागी झाले. सायलेंट रीडिंग मिशन उपक्रमात पालकांसाठी भरपूर पुस्तके मांडली होती .पुस्तक निवडून पालकांनी निसर्गरम्य वातावरणात दीड ते दोन तास वाचन केले. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी शुभेच्छा दिल्या तर संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे यांनी सायलेंट रीडिंग मिशन चा उद्देश सांगितला . या उपक्रमाचे समन्वयक प्रशांत शिंदे यांनी पार्श्वभूमी मांडली यावेळी दैनिक लोकमतचे संपादक मा. श्री धर्मराज हल्लाळे यांनी वाचन उपक्रमास सदिच्छा भेट दिली व मुलांनी तयार केलेले वार्तापत्र पाहिले . या वाचन उपक्रमातून मुलांनी ,पालकांनी भरपूर वाचावं अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी पालक समिती सदस्य प्रभाकर हिप्परगे यांनी मुद्रित शोधनाचे काम केलेला ''क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय'' खंड ज्ञानप्रकाशच्या ग्रंथालयास भेट दिला. उपक्रमाच्या समारोपप्रसंगी पालकांनी वाचन उपक्रम सुरू केल्याबद्दल मुख्याध्यापिका सविता नरहरे यांचे आभार व्यक्त केले व आम्हाला नियमित वाचनासाठी यायला आवडेल असेही सांगितले.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ता योजना लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्र समिती गठीत

## अध्यक्षपदी आ. रमेशअप्पा कराड तर समीतीत पाच जणांचा समावेश

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यातील भाजपा महायुती शासनाने नव्याने सुरू केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली लातूर ग्रामीण विधानसभा क्षेत्राची समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत विविध विभागातील अधिकाऱ्यांसह पाच शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.



ग्रामीण भागात शेतकऱ्यांना सातत्याने अडचणीचा आणि त्रासदायक ठरणारा शेत रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना सुरू केली असून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि योजनेचे सनियंत्रण व समन्वय साधण्यासाठी आमदार महोदयाच्या अध्यक्षतेखाली विधानसभा क्षेत्रात समिती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शासनाच्या निर्णयानुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदार क्षेत्रासाठी आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना समिती गठीत करण्यात आली असून या समितीत सचिव उपविभागीय अधिकारी लातूर, सहसचिव उपविभागीय अधिकारी औसा रेणापूर, समिती सदस्यात शेतकरी प्रतिनिधी अनिल भाऊसाहेब भिसे, सुकेश किशनराव भंडारे, सुरज जगन्नाथ शिंदे, दीपक भागवत वागस्कर, राजकिरण माणिकराव साठे त्याचबरोबर संबंधित क्षेत्रातील गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमि अभिलेख, वनपरिक्षेत्र अधिकारी, उप अभियंता सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता जिप बांधकाम आणि पसचे लेखाधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदरील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजना समिती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी, योजनेचे सनियंत्रण व समन्वय साधण्या बरोबरच ज्या ठिकाणी रस्ते अतिक्रमण केले आहेत अशा ठिकाणीची अतिक्रमणे काढणे, कार्यकारी यंत्रणेची निवड करणे, रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड, एका गावाहून दुसऱ्या गावात जाणाऱ्या अधिक लांबीच्या शेत रस्त्याचे ग्रामीण रस्त्यात रूपांतर करून ग्राम विकास विभागाकडे रस्त्याची शिफारस करणे यासह रस्त्याच्या अनुषंगाने कार्य करणार आहे.

या समितीत निवड झाल्याबद्दल समिती अध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्यासह शेतकरी प्रतिनिधी सदस्य अनिल भिसे, सुकेश भंडारे, सुरज शिंदे, दीपक वांगस्कर, राजकारण साठे यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## बहुजन महामानवांना हायजॅक करण्याचा प्रतिगाम्यांचा प्रयत्न : प्रा. नागोराव कुंभार



**लातूर/प्रतिनिधी :** बहुजन उद्धारक क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्याबद्दल आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी आज सगळ्या वृत्तपत्रात महात्मा फुले : समाज परिवर्तनाचा दिपस्तंभ या शीर्षकाखाली लेख लिहिला आहे. हा प्रकार म्हणजे बहुजन महामानवाना हायजॅक करण्याचा प्रतिगामी शक्तींचा डाव आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य नागोराव कुंभार यांनी लातूर येथे केले.

जी -२४ च्या वतीने आज ११ एप्रिल रोजी सकाळी क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त लातूर येथील महात्मा फुले पुतळा येथे आयोजित आभिवादन कार्यक्रमात प्रा. कुंभार बोलत होते.

ते पुढे म्हणाले, महात्मा फुले यांचा विचार देशातील पुरोगामी चळवळीचा पायाभूत आधार आहे. आज दुर्दैवाने प्रतिगामी शक्ती बहुजनांच्या महामानवाना हायजॅक करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ज्या तत्वज्ञानाचा महात्मा फुले विरोध करत होते..तेच लोकं आज त्यांच्या विचारांचे विकृतीकरण करू पाहत आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं, अज्ञान हे वंचित, शोषितांचे मुख्य कारण आहे आणि महात्मा फुलेनी सांगितले की, शिक्षणाशिवाय बहुजनांचा उद्धार होणार नाही.. ही मुख्य कारणे आपण लक्षात घेतली पाहिजे. प्रारंभी जी -२४ ग्रुपच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यांनी आभार मानून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावणराजे आत्राम यांनी केले. तर नरसिंग घोडके यांनी आभार मानले.

यावेळी प्रा.डॉ.. हर्षवर्धन कोल्हापुरे, प्राचार्य आर. डी. निटुरकर, प्रा. अनंत लांडगे, नगरसेवक प्रा. शिवाजी जवळगेकर, नगरसेवक अतिश चिकटे, माधव बावगे, पांडुरंग देडे, उपजिल्हाधिकारी अशोक पुरी, माळी समाज महासंघाचे भारत काळे, प्रा. यू. डी. गायकवाड, माया गोरे, दत्ता सोमवंशी, शरद झरे, नगरसेवक अफजल कुरेशी, लक्ष्मण कांबळे, ॲड. वसंतराव उगले, प्रा. सुधीर अनवले,सी. के. माळी, कॉ. विश्वभर भोसले, ज्येष्ठ पत्रकार पँथर रामराव गवळी, नारायण कांबळे, शिरीष दिवेकर, मारोती माने, नामदेव घोडके, श्रीमती मंगल कांबळे, पांडुरंग अडसूळे, बरकत काझी, प्राचार्य सूर्यवंशी, प्राचार्य शिवाजी माडे, रिपाई नेते चंद्रकांत चिकटे, मोहन कांबळे सेलूकर, संग्राम वाघमारे आदिसह अनेक मन्यवरांची उपस्थिती होती.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची हिप्पळगाव सोसायटी संचालक मंडळाने घेतली भेट



**लातूर/प्रतिनिधी :** शिरुरअनंतपाळ तालुक्यातील हिप्पळगाव येथील जिल्हा मध्यवर्ती शाखा नूतन प्रशस्त इमारत व विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे उद्धाटन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या हस्ते व्हावे यासंदर्भात जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके यांच्या नेतृत्वाखाली हिप्पळगाव सोसायटीचे चेअरमन बापूराव माने, भागवत व्यंजने, रमेश सोनवणे,दिलीप गड्डीमे, नारायण कांबळे ,रामदास भूसागरे, व्यंकट खांडेकर, साबदे ,रमाकांत मुरुडकर, दत्ता पाटील यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी सभासद यांनी आज साहेबांची भेट घेतली..

सोसायटीच्या वतीने सत्कार

यावेळी हिप्पळगाव विवीध कार्यकारी सोसायटीच्या वतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर त्यांनी हिप्पळगाव शाखेच्या कामकाज व बँकेच्या नूतन इमारतीची माहिती घेतली लवकरच बँकेच्या नूतन इमारतीचे व विकास सोसायटी हिप्पळगाव च्या नूतन वास्तूचे उद्धाटन होणार आहे.

## भारतीय संविधान लोकशाहीचा खरा आधारस्तंभ - डॉ.युवराज सारणीकर

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान व निबंध स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** १० एप्रिल २०२६ रोजी दयानंद विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता कार्यक्रम'' अंतर्गत दोन दिवसीय उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते. *या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

गुरुवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य'' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. ८०० ते १२०० शब्द मर्यादेत असलेल्या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शुक्रवार दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी '' भारतीय संविधान मूलभूत अधिकार आणि कर्तव्य '' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते. *व्याख्याते म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. युवराज सारणीकर* यांनी भारतीय संविधानातील मूलभूत हक्क व नागरिकांच्या कर्तव्यांवर मार्गदर्शन केले.यावेळी ते म्हणाले की,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत.भारतीय राज्यघटनेमुळेच सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार मिळाला.तसेच भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार हे नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, स्वातंत्र्यासाठी आवश्यक असलेले सर्वोच्च हक्क आहेत.या मूलभूत अधिकार व कर्तव्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट झालेली आहे.राज्याच्या मनमानी कारभारावर निर्बंध घालून कायद्याचे राज्य स्थापन करून सामाजिक व राजकीय समता निर्माण केलेली आहे.भारतीय संविधान हेच लोकशाहीचे खरे आधारस्तंभ आहे, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे *सूत्रसंचालन प्रा.व्यंकटेश कैले* यांनी केले तर *आभारप्रदर्शन डॉ. सुरज कोल्हे* यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षिका डॉ.एस.पी. वाडीकर व डॉ.एस.एस. कोल्हे यांनी




समन्वयक म्हणून परिश्रम घेतले.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा जागर व संविधानिक मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

## महात्मा फुले यांना महाविद्यालयात अभिवादन

**बाभळगाव/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रारंभ प्रारंभ प्रकाश मेहकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रा.संतोष कल्याणकर उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक आणि आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.पांडुरंग मुंढे यांनी केले.

या प्रसंगी प्रा.संतोष यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना सांगितले की, महात्मा फुले हे भारतीय समाजातील अन्याय, अज्ञान २०२१. आणि जातिभेदाविरुद्ध लढणारे थोर समाजसुधारक होते. त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजात समतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्यामुळे समाजात जागृती निर्माण झाली आणि शोषित घटकांना नवा आत्मविश्वास मिळाला.महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ इतिहास नाहीत, तर आजच्या असमान समाजरचनेवर प्रखर उत्तर आहेत. सामाजिक समतेची लढाई ही केवळ घोषणांमध्ये नाही, तर शिक्षण, हक्क आणि संधींच्या समतेतून साकारते हीच या त्रयीची मूलभूत दिशा आहे.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मन:शांती, विश्वशांतीसाठी भारतीय योग व सूर्यनमस्कार दिशादर्शक : पोलंडचे तज्ञ डॉ. क्रिस्टॉफ स्टेक यांचे विचार

## ➤ विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांच्या निवासस्थानी घडला हृद्य संवाद

**लातूर/प्रतिनिधी :** सूर्यनमस्काराच्या माध्यमातून शारीरिक स्वास्थ, योग चिकित्सा, मन:स्वास्थ आणि पर्यायाने समाज स्वास्थ साध्य करणे आजच्या वैश्विक अशांतीच्या काळात गरजेचे आहे, असे विचार वॉर्सा, पोलंड येथील शारीरिक शिक्षण शास्त्रातील तज्ञ प्राध्यापक डॉ. क्रिश्टॉफ स्टेक यांनी व्यक्त केले.

भारत भेटीवर आले असतांना ते थोर शिक्षण तज्ज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा कराड यांच्या विश्वशांती क्षेत्रातील कार्याने प्रभावीत होऊन त्यांना भेटायला कोथरुड येथील त्यांच्या निवासस्थानी आले. यावेळी निमंत्रतासाठी एक स्नेहमेळावा आयोजीत करण्यात आला होता. या प्रसंगी डॉ. स्टेक यांना मानाची शाल आणि जगतातील सर्वात मोठ्या विश्वशांती घुमटाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. आपली भावना व्यक्त करताना डॉ. क्रिश्टॉफ स्टेक म्हणाले, भारतीय संस्कृती ही नुसती एक जीवनशैली नसून ती जीवनाचे एक संपूर्ण तत्वज्ञान आहे. विविध धर्म, कला, संगीत, संस्कार आणि परंपरा यांचे संगम असलेली भारतीय संस्कृती केवळ भारताच नव्हे तर संपूर्ण जगभर आदर्श मानली जाते. त्याची सुंदरता, विचार आणि त्याची संस्काराधारा हे



प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा आधार बनतात. विविधता, अध्यात्म आणि वसुधैव कुटुंबकम या तत्वावर आधारित आध्यात्मिक व नैतिक मूल्ये, योग व आयुर्वेद यांचे मानवाच्या विकासात योगदान तसेच मानवतेची शिकवण देते.

विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी भावना व्यक्त केली की सध्याच्या युद्ध जन्य परिस्थितीमध्ये जेव्हा जग तिसर्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहेत, अशा वेळेस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध स्थगितीची घोषणा करुन जगाला एका मोठ्या संकटापासून वाचविले आहे. त्याबद्दल राष्ट्रपती ट्रम्प आणि इराणचे सरकार यांचे आभार.

डॉ. क्रिश्टॉफ स्टेक यांच्या भेटीच्या निमित्ताने जगात शांतता आणि सद्भाव पसरविण्याचा संदेश दिला जावा अशी आशा ही डॉ. कराड यांनी व्यक्त केली. विश्वगुरु भारताची ही स्वत्वाचा बोध घेणारी मालिका कायम सुरू राहिली पाहिजे असे त्यांनी उपस्थितांना संबोधिले.

माईर्स चे रजिस्ट्रार डॉ. रत्नदीप जोशी यांनी सांगितले की, डॉ. स्टेक यांनी पोलंड येथील यान युनिव्हर्सिटीमधून शारीरिक शिक्षणात पीएचडी केली आहे. ते गेल्या ५० वर्षापासून भारतात येऊन येथे त्यांनी कैवल्य धाम योगसंस्था, बनारस हिदू युनिव्हर्सिटी इ. संस्थामधून संस्कृत आणि योगविषयी संशोधन केले आहे. भारतीय संस्कृतीचे वैश्विक वैचारिक दर्शन सर्व जगाला घडविण्यासाठी युरोप पासून सर्व खंडांमध्ये डॉ स्टेक करीत असलेले कार्य भारतमातेचे गौरवशाली महात्म्य वर्णन करते.

या प्रसंगी प्रा.डॉ. कराड सर यांच्या प्रेरणादायी जीवनयात्रेवर आधारित डॉ. संजय उपाध्ये यांनी रचलेल्या निवडक गीतांचे सांगीतिक सादरीकरण प्रा. शशांक दिवेकर यांनी केले. प्रा. शशांक दिवेकर यांनी या गीतांना श्रवणीय चाली बाधले आहेत. पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतींचे ऋणानुबंध घट्ट करून वसुधैव कुटुम्बकम या तत्वाचे सर्वांना स्मरण करून देणारा हा हृदय संवाद उपस्थित निमंत्रित सर्वांना खूपच भावला. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय क्षेत्रातील वरिष्ट मान्यवर या ज्ञान चर्चासत्रासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास कामांना स्थगिती देण्याच्या ठरावाची अंमलबजावणी होवू नये ;शहर भाजपाचे मनपा आयुक्तांना निवेदन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शहरात सुरु असलेल्या विकास कामांना स्थगिती देण्याचा ठरावा दि. १० मार्च रोजी झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेला होता. सभागृहात घेण्यात आलेला ठराव आणि इतिवृत्तात झालेली नोंद यामध्ये तफावत दिसत आहे. या माध्यमातून हा ठराव केवळ भ्रष्टाचाराला नजरेसमोर ठेवून घेण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या ठरावाची अंमलबजावणी होवू न देता सदर ठराव शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविण्यात यावा, अशी मागणी करून तोपर्यंत शहरातील विकास कामे सुरुच ठेवावीत अशी मागणी शहर जिल्हा भाजपाच्या वतीने मनपा प्रशासनाकडे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, विरोधी पक्षनेते देविदास काळे व गटनेते अॅड. दिपक मठपती यांनी केली आहे.

महानगरपालिकेत काँग्रेस सत्तेत आलेली असून त्यांचे बहुमतही आहे. या बहुमताच्या आधारावर दि. १० मार्च रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी काँग्रेस पक्षाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शहरात सुरु असलेल्या विकास कामांना स्थगिती देण्यात ठराव घेतलेला आहे. या ठरावाला सभागृहात भाजपाने विरोध केलेला आहे. मात्र, सभागृहात घेण्यात आलेला ठराव आणि प्रत्यक्षात इतिवृत्तात घेतलेली नोंद यामध्ये मोठी तफावत असून सत्ताधाजयांनी प्रशासनावर दबाव टाकून कामे थांबविण्याचे आदेश दिले गेले आहेत. त्यामुळे सत्ताधाजयांची ही कृती केवळ भ्रष्टाचारापोटी केलेली असून या माध्यमातून शहरातील विकास कामांना खिळ घालण्याचे काम होत आहे. त्यामुळे प्रशासनाने सत्ताधारी काँग्रेसच्या कृतीला पाठीशी न घालता सदर ठराव शासनाकडे विखंडित करण्यात पाठवावा, अशी मागणी शहर जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आली आहे. जोपर्यंत हा ठराव शासनाकडून विखंडित होत नाही तोपर्यंत याची अंमलबजावणी न करता प्रशासनाने विकास कामे सुरु ठेवावीत, अशी मागणी मनपा आयुक्त यांच्याकडे शहर जिल्हा भाजपाच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, विरोधी पक्षनेते देविदास काळे व गटनेते अॅड. दिपक मठपती यांनी केली आहे.

## मुक्तांगणच्या चिमुकल्यांनी साजरी केली महात्मा ज्योतिबा फुले जयंती

**लातूर/प्रतिनिधी :** येथील विशाल नगर परिसरातील मुक्तांगण इंग्लिश स्कुल मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्या सुमेरा शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका माधुरी वाघमारे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्रीशिक्षणासाठी केलेल्याकार्याची माहिती दिली. या प्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिबाफुले यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# भीक मागणाऱ्यांची संख्या शून्यावर आणण्याकरिता सर्वतोपरी उपाय योजना राबवा : महेश ढवळे

**लातूर/प्रतिनिधी :** पुरोगामी विचारधारेने प्रेरित असणाऱ्या आपल्या महाराष्ट्र राज्यातील भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या शून्यावर आणण्याकरिता राज्य शासनाकडून तात्काळ सर्वतोपरी उपाय योजना राबविण्यात याव्यात असे निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिले आहेत.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ च्या कलम १६ अन्वये राज्य अन्न आयोगास अन्नसुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीचे , तक्रारींचे परीक्षण करून राज्य शासनास शिफारसी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. फोरम फॉर इनोव्हेशन अँड ऍप्लिकेशन, फिन ऍप असो. ने राज्य शासनाच्या अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाविरुद्ध असा मुद्दा उपस्थित केला आहे की, राज्यात अन्नधान्य उत्पादन मुबलक आहे. शासनाकडून विविध कल्याणकारी योजना अस्तित्वात असूनही सार्वजनिक ठिकाणी भीक मागणाऱ्यांची संख्या वाढत आहे. ज्यामुळे राज्याची प्रतिमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यात भिकवृत्ती प्रतिबंधक कायदा लागू असून भीक मागणे व भीक देणे हे दंडनीय कृत्य घोषित आहे. राज्य शासनाने या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी भिक्षेकरीगृहे, बालसंरक्षण संस्था व पुनर्वसन योजना कार्यान्वित केलेल्या आहेत.

राज्य अन्न आयोगाकडे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने दि. २० जून २०२५ रोजी सदर प्रकरणी प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा शोध घेण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीत अन्न नागरी पउरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग, नगर विकास विभाग, सामाजिकण्यास विभाग या सर्व विभागांच्या शासकीय प्रतिनिधींचा समावेश होता. या समितीकडून मिळालेल्या अहवालानुसार राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत. जिल्हास्तरीय जबाबदारी निश्चित करणे, कार्यकारी अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणे, वंचित लाभार्थी शोध मोहीम, जनजागृती मोहीम राबविनयेत यावेत असे निर्देश दिले आहेत. अन्नासाठी भीक मागणाऱ्या व्यक्तींची संख्या शून्यावर आणणेही मुख्य उद्देश्य समोर तेहवून विशेषकृती आराखडा तयार करावा. आंतरराज्य भीक मागणारी टोळी मुंबई, पउणे यासारख्या मोठ्या शहरात जास्तीच्या दिसून येतात. अशा भीक मागणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून ते ज्या राज्यातील आहेत, त्यांना त्या राज्यात पाठवून देण्यात यावेत. जिल्हास्तरीय अन्नसुरक्षा व पुनर्वसन समिती स्थापन करण्यात यावी. भिकवृत्ती ही केवळ कायदा व सुव्यवस्थेची बाब नसून ती अन्न सुरक्षा, मानवी सन्मान व सामाजिक न्यायाशी निगडित आहे.राज्य शासनाच्या धोरणात्मक प्रयत्नांना बाधा न आणता , कार्यकारी स्तरावरील त्रुटी



दूर करून महाराष्ट्र राज्य 'भिकमुक्त, भूकमुक्त' करण्यासाठी तातडीने प्रभावी उपाय योजना राबविण्याकरिता राज्य शासनामार्फत संबंधित विभागामध्ये समन्वयाने एक संयुक्तिक शासन निर्णय निर्गमित करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे महेश ढवळे यांनी सांगितले.

# कमी पाण्यात अधिक उत्पन्न देणाऱ्या रेशीम उद्योगाला चालना मिळेल आ. अभिमन्यू पवार

**औसा/प्रतिनिधी :** बदलत्या हवामानात आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना रेशीम शेती हा एक उत्तम व शाश्वत पर्याय आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी तालुक्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या उद्योगाकडे वळावे, असे प्रतिपादन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले. औसा पंचायत समिती येथे शुक्रवारी रेशीम उद्योगाच्या विकासासाठी आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत ते बोलत होते. यावेळी औसा तालुक्यातील प्रत्येक गावात रेशीम शेतीचा प्रसार करण्याचा संकल्प करण्यात आला. यासाठी प्रशासनाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना आमदारांनी केली. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, पं.स. सभापती गंगाबाई



कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, औसा महिला ग्रो प्रोड्यूसर कंपनीच्या अध्यक्षा शोभाताई पवार, उमेद प्रभाग समन्वयक व महिला संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उत्तम पर्याय सध्याच्या बदलत्या हवामान परिस्थितीत आणि सातत्याने भेडसावणाऱ्या वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक शेती पद्धतीत बदल करणे काळाची गरज बनली आहे. उसासारख्या अधिक पाणी लागणाऱ्या पिकांऐवजी कमी पाण्यात अधिक व खात्रीशीर उत्पादन देणाऱ्या पिकांकडे वळण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या संदर्भात रेशीम शेती हा शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत प्रभावी, शाश्वत आणि दीर्घकालीन पर्याय ठरू शकतो, असा भक्कम विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला.

## आशाताई ..

आशाताईं गायकी
आगळाचं अंदाज
परमेश्वरीय वरदान
मंगेशकरी घरंदाज

तुम्हीचं गावी दिदी
लावणी ठसकेबाज
अश्लीलता दूर पळे
कुणीकरु नकामाज

बालगीते लडिवाळी
लुभावे अजून आज
भुपाळी जागे करते
अंगाई निंद्रा मसाज

भक्तीगीत सुधावर्षा
ईश्वरा अर्पिला साज
देव सुद्धा भारावला
माधुर्ये सूर सर ताज

पाश्चिमात्य गाण्यात
विभूषीत हो आवाज
प्रेमगीते युगुल गाणी
गालावर मयुरी लाज

सर्वांसाठी सर्व काही
उपकृत केला समाज
फिटता फिटेना मुद्दल
ताई कसे फेडू व्याज

फिक्के सतार तबला
व्हायोलिन पखवाज
महाराष्ट्र कन्या आहा
समस्त विश्वास नाज

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# रघुनाथ नाना म्हणजे संघटन, त्याग आणि अभिमान यांचे जिवंत उदाहरण - डॉ. संजय जमदाडे




**लातूर/प्रतिनिधी :** सोलापूरच्या मातीत पुन्हा एकदा इतिहास जागा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अखिल भारतीय हिंदू खाटीक समाजाचे माजी अध्यक्ष व थोर स्वातंत्र्यसेनानी स्व. रघुनाथराव (नाना) जाधव यांच्या जयंतीनिमित्त बाळे येथील हिंदू खाटीक समाज मंदिरात दि. १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य आणि प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व नानांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यानंतरचा प्रत्येक क्षण उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमात नानांच्या कार्याचा आणि त्यागाचा गौरव करताना उपस्थितांनी भावनांनी भरलेले वातावरण अनुभवले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले लातूरचे साहित्यिक, कवी डॉ. संजय जमदाडे यांनी आपल्या प्रभावी कवितांमधून नानांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

यावेळी संजय घोलप यांनी नानांच्या कार्याचा सखोल आढावा घेताना सांगितले की, नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून समाजासाठी जळणारी मशाल आहे. त्यांनी नानांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे जिवंत चित्र उभे केले. हैदराबाद येथे नानांची हत्तीवरून काढण्यात आलेली भव्य मिरवणूक आणि शहरभर साखर वाटपाचा ऐतिहासिक प्रसंग त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केला.

कार्यक्रमात कानिफनाथ थोरात, संतोष क्षीरसागर, दीनानाथ रत्नपारखी आणि नाथजी कोथिंबीरे यांनीही मनोगत व्यक्त करत नानांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.

नानांचा इतिहास हा केवळ अभिमानाचा विषय नसून तो आपली जबाबदारी आहे, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी संतोष धाकपाडे, रविंद्र तांदळे, अंबादास (मास्तर) कांबळे, लखन लोखंडे, निलेश खडके, यश क्षीरसागर, प्रणव क्षीरसागर यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**खरेदी प्रक्रिया**
विभागीय भांडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/ कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर **www.ireps.gov.in** ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/ Sr DMM/ T No.: 96265133, दिनांक: १०.०४.२०२६. तपशील:** RDSO विनिर्देश क्रमांक IS/ RDSOCG/ 0002:2025 शुद्धिपत्र-०१ सह किंवा रेल्वेने निर्दिष्ट केलेल्या अद्ययावत विनिर्देशांनुसार, शिरोभागी पाण्याची टाकी असलेल्या १५५ डब्यांच्या संचामध्ये IOT-आधारित रिअल-टाइम पाणी पातळी देखरेख युनिट चा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करणे. **प्रमाण:** १५५ संच. **अनामत रक्कम (INR):** १,१४,९००/-. **www.ireps.gov.in** वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २२.०४.२०२६ रोजी ११:३० वाजल्यानंतर. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रके पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in**
**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-24
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**खरेदी प्रक्रिया**
विभागीय भांडार कार्यालया,मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/ कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर **www.ireps.gov.in** ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित केल्या जात आहेत. **निविदा क्रमांक: SUR/Sr. DMM / T No.: 96255853A, दिनांक: १०.०४.२०२६.** तपशील: हलक्या वजनाच्या लिथियम बॅटरी टॅम्पिंग मशीनचा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन - एक संच ज्यामध्ये २ टॅम्पर्सचा समावेश आहे. (सोबत जोडलेल्या परिशिष्ट A- मधील तपशीलांनुसार, यामध्ये ८ बॅटरी, ४ चार्जर्स, ०४ टॅम्पिंग साधने आणि ०२ वाहतूक ट्रॉलीजचा समावेश आहे). **प्रमाण:** २९ संच. **अनामत रक्कम (INR):** ४,६८,१३०/-. www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २७.०४.२०२६ रोजी ११:३० वाजल्यानंतर. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी, या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/ शुद्धिपत्रक पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in**
**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-25
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
धाब्बरप्रूफ
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६